ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825 (UIF) VOLUME - 5 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# बनगरवाडी : एक शोकात्मिका

प्रा. डॉ. भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर.




**KEY NOTE :** ग्रामीण महाराष्ट्राच्या शोकात्म जीवनाचा प्रगल्भ आविष्कार म्हणजे 'बनगरवाडी' कादंबरी होय.

**ABSTRACT :** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर साकार होणारी बनगरवाडी कादंबरी शोकात्म जीवनाचे अनेक पदर घेऊन साकार होते. कादंबरीच्या कथानकातून, व्यक्तिरेखातून, घटनाप्रसंगातून आणि वातावरणनिर्मितीतूनही शोकात्मीकेचा सूर प्रकट होतो.

## प्रास्ताविक :

मराठी ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणाऱ्या ग्रामीण कादंबरीची परंपरा निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य व्यंकटेश माडगूळकर यांच्या रुपाने मराठी साहित्यात झालेले आहे. माडगूळकरांनी आपल्या सभोवतालच्या ग्रामीण जीवनानुभवाचे वास्तव चित्रण आपल्या समृद्ध लेखन विश्वातून केलेले आहे. मराठी कादंबऱ्यांच्या स्थित्यंतराची सुरुवातच माडगूळकर यांच्या रूपाने झालेली आहे. रंजनवादी प्रवृत्तीतून वास्तववादी प्रवृत्तीकडे मराठी कादंबरी घेऊन जाण्याचे श्रेय प्रामुख्याने माडगूळकर यांनाच दिले जाते. माडगूळकरांच्या लेखन अभिव्यक्तीला माणदेशातील मातीचा आणि भाषेचा गंध लाभलेला आहे. या पार्श्वभूमीवर माडगूळकर हे प्रादेशिक कादंबरीच्या नव्या विश्वाचे दर्शन घडविणारे पहिले कादंबरीकार ठरतात. माणदेशी वैशिष्ट्यांसह तिथल्या जीवन जाणिवा अभिव्यक्त करण्याची नेमकी दिशा माडगूळकरांनी स्पष्ट केली ती 'बनगरवाडी' या कादंबरीच्या रूपाने. बनगरवाडी ही माडगूळकरांची पहिली कादंबरी मराठी मध्ये प्रादेशिक कादंबरीचा महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखली गेली आहे.

माणदेशातील दुष्काळाने होरपळून जाणाऱ्या भौगोलिक प्रदेशाचे विविधांगी चित्रण तसेच तिथे जगणारी आणि नैसर्गिक आपत्तीला सातत्याने सामोरे जाणारी, संघर्ष करणारी चिवट माणसं माडगुळकरांच्या या कादंबरीतून नेमकेपणाने उभी राहिलेली आहेत. बनगरवाडी ही कादंबरीच्या विविध घटक अंगांना स्वतंत्रपणे सिद्ध करण्यात यशस्वी झालेली कादंबरी आहे. या कादंबरीतून साकार झालेला एक महत्त्वाचा पदर म्हणजे एकात्मिक जीवनाचे विचारप्रवृत्त करणारे जीवनदर्शन. प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने बनगरवाडी कादंबरीतून साकार झालेल्या शोकात्मिक जीवनाचे विविधांगी पदर विचारात घेता येतील.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या रूपाने खरे तर मराठी साहित्याला कधी नव्हे ते ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण झाले. त्यांच्या रूपाने मराठी ग्रामीण कादंबरी अधिकाधिक समृद्ध होण्याची एक वेगळी वाट निर्माण झाली. बनगरवाडी या टप्प्यावरील महत्त्वाची कादंबरी म्हणून मराठी साहित्य वर्तुळात चर्चिली गेली

आहे. कादंबरीच्या सर्वच घटक अंगात माडगूळकरांनी अमुलाग्र स्वरूपाचे बदल केल्यामुळे ही कादंबरी अधिक चर्चिली गेली आहे. कादंबरीच्या प्रारंभापासूनच शोकात्मिकेची जाणीव वाचकाला होत जाते.

''आजूबाजूला सपाट मोकळा माळ, बाजरीची तांबडी राने आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस—पस्तीस घरे, अशी बनगरवाडी होती. बहुतेक घरांच्या भिंती मातीच्या होत्या आणि छपरे खपलीच्या काडाने शेकारलेली होती.''[१] स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण भारताची ही दशा झालेली होती. या ग्रामीण भारतातील सामान्य माणसाला सोसाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदनांची जाणीव प्रथमत: तेवढ्याच संवेदनशीलतेतून व्यंकटेश माडगूळकर यांनी शब्दांकित केलेली दिसून येते.

बनगरवाडी ही कादंबरी माणदेशाच्या भौगोलिक पार्श्वभूमीला घेऊन साकार होते. माणदेशातील बराचसा भाग हा प्रामुख्याने दुष्काळाच्या छायेत वावरणारा भाग आहे. अशाच दुष्काळाला सातत्याने सामोरे जाणारी माणसं बनगरवाडी या कादंबरीतून भेटत राहतात. या कादंबरीच्या आशयातून साकार होणारी विविधता डॉ.भास्कर शेळके यांच्या मतातून अधोरेखित होते. ते म्हणतात,''दशम्यांचे पेंढके घेऊन राजाराम सौंदणीकर मास्तर माळरानावर वसलेल्या उजाड वाडीत येतो. गावच्या धनगरांच्या पोरांना शिकविण्याचा प्रयत्न करतो आणि त्याबरोबर धनगरांच्या जीवनाशी समरस होतो. दुष्काळामुळे जगण्यासाठी मेंढराबरोबर गाव सोडून लोक परगावी जातात. मास्तर ही बनगरवाडी सोडून परत जातो. लेखकाच्या स्वानुभवाचा हा प्रदेश आहे. मान नदीच्या काठच्या माणदेशातील विटे आटपाडी या औंध संस्थानातील पंत सरकारच्या राजवटीतील अवर्षणग्रस्त प्रदेशातील धनगरवाडीतील उपेक्षित धनगर यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर लोकजीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे.''[२] डॉ.शेळके यांच्या विवेचनावरून प्रस्तुत कादंबरीतून साकार होणारी शोकात्मिका ही दुष्काळाची पार्श्वभूमी घेऊन कशी अभिव्यक्त होते ते स्पष्ट होते. निसर्गाच्या प्रकोपाने संघर्ष करणारी माणसं बनगरवाडीत भेटतात. म्हणजेच बनगरवाडीतील माणसांच्या वाट्याला येणाऱ्या शोकात्मिकाचे कारण हे लहरी निसर्ग असलेला दिसून येतो.

भारताला स्वातंत्र्य मिळाले खरे परंतु, सामान्य माणसांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खात आजही भरच पडत चाललेली आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक खेडी आजही सोयीसुविधांपासून परागंदा असलेली दिसून येतात. बनगरवाडी ही तर स्वातंत्र्याच्या प्रारंभीच्या काळातील एक मागास आणि दुर्लक्षित खेडे आहे. शासनाच्या धोरणाचा परिणाम म्हणून बनगरवाडीत शाळा सुरू होते. सौंदणीकर नावाचा मास्तर बनगरवाडीतील धनगरांच्या मुलांना शिकविण्याचा प्रयत्न करतो. परंतु, परंपरागत व्यवसायालाच आपले सर्वस्व मानून जीवन जगणारी ही साधीभोळी धनगर शिक्षणाचे महत्व ओळखत नाहीत. परिणामी त्यांच्या वाट्याला वैफल्यग्रस्त जीवनच येत राहते.

बनगरवाडी हे एक समूह जीवन जगणारे गाव आहे. या गावात येणारा मास्तर ही या गावाशी आणि तिथल्या जगण्याशी एकरुप होतो. या गावाची रूपरेषा बदलण्याचा प्रयत्न करतो. एकूणच या गावच्या शोकात्मिकतेला सुखात्मीकेत परावर्तीत करण्याचे स्वप्न घेऊन वावरणारा सौंदणीकर मास्तर ही महत्त्वाचा ठरतो. या अनुषंगाने या कादंबरीच्या अंतर्भागाला प्रकाशित करताना डॉ.रवींद्र ठाकूर म्हणतात,''रम्य म्हणावा असा निसर्ग नसलेले, चित्ताकर्षक घटना नसलेले व रुक्ष वाटावे असे हे जीवन राजाराम सौंदणीकर या शिक्षकाच्या मुखातून निवेदित केले जाते. तो केवळ तटस्थ निवेदक नाही. बनगरवाडीचा प्राकृतिक रंगगंध आकळू पाहणारा, तो व्यक्त करण्यासाठी धडपडणारा असा हा निवेदक आहे. त्याची भूमिका मध्यस्थासारखी नाही. बनगरवाडीने त्यांचेही भावविश्व व्यापून टाकले आहे.''[३] डॉ.ठाकूर यांनी बनगरवाडीतील शोकात्मकेला केंद्रस्थानी ठेवून केलेले विवेचन बनगरवाडीच्या एकूणच भावविश्वाचे दर्शन घडविणारे आहे.

कादंबरीतून साकार होणाऱ्या व्यक्तिरेखाही परिस्थितीला शरण गेलेल्या आणि पारंपरिक जीवन अनुसरलेल्या आहेत. आलेल्या दिवसाला सामोरे जाणाऱ्या अशाच आहेत. काही खल प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखाही या कादंबरीतून दादू बालट्याच्या रूपाने भेटतात. परंतु, त्याही व्यक्तिरेखेला पुढे पुढे परिस्थितीला शरण जाऊन शोकात्मतेला पत्करावे लागते. याचे प्रत्ययदर्शी चित्रण या कादंबरीतून येते. शेकूबाची बायको मोठ्या धीराने येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करीत राहते. परंतु शेकूबाला लवकरच त्याचा विसर पडतो व तो अंजीच्या नादी लागून आपल्या बायकोला विसरून जातो. या पातळीवर तिलाही

खरेतर शोकात्म जीवनाला सामोरे जावेच लागते. अशा व्यक्ती चित्रणाच्या अनुषंगाने ही कादंबरीतून शोकात्म जीवनाचे विविधांगी दर्शन घडते. त्याचबरोबर बनगरवाडीत घडणाऱ्या छोट्या—मोठ्या घटनातूनही कादंबरीतील शोकात्मीकेचा चेहरा वाचकांच्या प्रत्ययास येतो. एवढेच नव्हे तर बनगरवाडीतून साकार झालेले वातावरण, निसर्गचित्रण यातूनही शोकात्मभावच प्रकट होतो. या पातळीवर होणारे शोकात्मिकाचे दर्शन कसे व्याकूळ करून सोडते. याविषयी डॉ.तानाजी राऊ पाटील म्हणतात,‘‘बनगरवाडी आणि परिसरात मोठा दुष्काळ पडतो. पेरलेली पिके उगवत नाहीत. जनावरांना चारा मिळत नाही. माणसाला पिण्याला पाणी मिळत नाही. बनगरवाडी आणि माणदेशाचा प्रदेश वैराण वाळवंटासारखा होऊन जातो. माणसे आपली जनावरे, कुटुंब घेऊन गाव सोडून पोट भरण्यासाठी दूरच्या गावाला जातात. एकेक करता करता शेवटी मास्तरची बदली दुसऱ्या गावाला होते. आयबू त्याच्याबरोबर जातो. उध्वस्त झालेल्या बनगरवाडीचे चित्र व्याकूळ करून सोडणारे व्यक्त होते.’’[४] पाटील यांच्या या वरील विवेचनावरून कादंबरीचा घटनाक्रम हा कादंबरीच्या शोकात्मिकेचे भावविवश करणारे दर्शन घडविणारा आहे हे स्पष्ट होते.

बनगरवाडी कादंबरीतील ऋतू चक्रानुसार शेतकऱ्यांच्या कष्टात आणि जीवनात होणारे बदल, सातत्याने पडणारा दुष्काळ, या दुष्काळामुळे वाट्याला येणारे भयाण जीवन माणदेशातील चिरंतन दु:खाचे चित्रण करणारे आहे. दैनंदिन जगण्याचा क्रम ठरवून जगणारी धनगरं आपल्या दैनंदिन जीवनक्रमापासून इतर गोष्टीकडे लक्ष देण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे ती शिक्षण, नवे विचार, नव्या जाणिवापासून अलिप्तच राहिलेली दिसून येतात. या बनगरवाडीतील माणसांचे जगणे, त्यांचे दु:ख, त्यांच्या व्यथा, वेदना माडगूळकरांनी अतिशय जिव्हाळ्याने मांडलेल्या आहेत. खरेतर शोकात्मिक जीवनाची विचार प्रवृत्त करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणून बनगरवाडी या कादंबरीकडे पाहता येते.

## समारोप :

सरतेशेवटी सारांश रूपाने असे सांगता येते की, बनगरवाडी या कादंबरीतून साकार झालेली शोकात्म जीवनाची कहाणी ही तत्कालीन ग्रामीण महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारी कहाणी आहे. ग्रामीण कादंबरीच्या प्रादेशिक जीवन चित्रणाची परंपरा निर्माण करणारी बनगरवाडी ही कादंबरी मैलाचा दगड ठरावी अशीच कादंबरी व्यंकटेश माडगूळकर यांच्या रुपाने लिहिली गेली आहे. या कादंबरीची विविधांगे विचारात घेताना त्यातील शोकात्मिका ही अभ्यासकांना विचार प्रवृत्त करून सोडणारी आहे.

## संदर्भ :

१.व्यंकटेश माडगूळकर, बनगरवाडी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, सत्ताविसावी, आवृत्ती २०१४ पृ.३.
२.डॉ.भास्कर शेळके, मराठी कादंबरीतील प्रादेशिकता, स्नेहवर्धन, प्रकाशन, पुणे, द्वि.आ.२००४, पृ.४८.
३.डॉ.रवींद्र ठाकूर, मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वि.आ.२००१, पृ.११५.
४.प्रा.डॉ.तानाजी राऊ पाटील, मराठी कादंबरी : समीक्षा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पुनर्मुद्रण २०११ पृ.२१.